(दादा वि. देऊबाई)

**वादीतर्फे सा.क्र.१ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. तनपुरे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ६२ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

1) फेरफार क्र. २३८९ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ८५**

2) आरटीएस अपील क्र. २५८/२०१६ ची न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत **नि.क्र. ८६**

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ३अ ते ३ड तर्फे विधीज्ञ श्री. ए. आर. वाळके यांच्यामार्फत-**

३. मी अशिक्षित आहे. मला लिहिता-वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील माहिती माझ्या वकिलांना माझ्या पुतण्याने दिली. मला वादग्रस्त मिळकतीचा गट नंबर सांगता येणार नाही. मी व भगवंता असे दोन भाऊ आहोत. मयत प्रतिवादी देऊबाई ही आमची आई होती. ती अंदाजे १० वर्षापुर्वी मयत झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाऊ भगवंता व आई देऊबाई यांच्या रे.मु नं. ५७३/१९८० अन्वये न्यायालयातुन वाटप झाले होते. प्रतिवादी देऊबाई हिच्या नावाने असलेली जमीन माझ्या वडिलांनी तिच्या नावे केली होती. देऊबाईच्या नावे एक एकर क्षेत्र आले होते. हे म्हणणे खरे नाही की, १९८० च्या वाटपाने प्रतिवादी देऊबाई हिच्या नावे वादग्रस्त मिळकत आली. हे म्हणणे खरे नाही की, १९८० साली वाटप झाल्यापासून माझे व प्रतिवादी देऊबाई यांचे क्षेत्र वेगवेगळे होते. मी व माझा भाऊ भगवंता हे गेल्या १० वर्षापासून वेगळे राहतो.

४. १९८० पासून वादग्रस्त मिळकत ही देऊबाई हिच्याच ताब्यात होती. प्रतिवादी क्र. ३ दशरथ खेमनर वावरत जांभळी येथे राहण्यास असल्याबद्दल मला कल्पना नाही. प्रतिवादी देऊबाई हिने प्रतिवादी क्र. ३ याला जमीन कधी विकली हे मला सांगता येणार नाही. २००१ साली मी व भगवंता एकत्र राहत नव्हतो. मी व माझा भाऊ भगवंता प्रतिवादी क्र. २

यांच्यात कुठलेही वाद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र. २ भगवंता यांचा एक विचार आहे.

५. देऊबाईने जमीन विक्री केली त्यावेळेस तिने प्रतिवादी क्र. ३ खेमनर यांना ताबे साठेखत करून दिले होते. त्यानंतर तिने खरेदीखत करून दिल्याबद्दल मला कल्पना नाही. प्रतिवादी क्र. १ हिने प्रतिवादी क्र. २ याला दि. २८/०५/२००१ रोजी खरेदीखत करून दिले त्यावेळेस प्रतिवादी क्र. २ भगवंता हा दुय्यम निबंधक कार्यालयात हजर होता व सदर खरेदीखतावर त्याची स्वाक्षरी असल्याबद्दल मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००१ ते सन २००८ या कालावधीत मी प्रतिवादी क्र. ३ याच्याविरूध्द सदर खरेदीखताविरूध्द कुठलाही दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००१ ते २००८ या कालावधीत प्रतिवादी क्र. ३ याने वादग्रस्त मिळकतीत ऊस व गहू असे पिके घेतली.

६. मला माझ्या कुटुंबात असलेल्या मिळकतींचे गट क्रमांक सांगता येणार नाही. प्रतिवादी खेमनर याला त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ५ तर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. शेळके यांच्यामार्फत-</u>**

७. वादग्रस्त मिळकतीचा सर्व्हे क्र. ३४ आहे. माझी गट क्र. १०१/१ मध्ये जमीन असल्याबद्दल मला सांगता येणार नाही. त्यातील काही जमीन मी माझी पत्नी सुंदराबाई हिचे नावे केल्याबद्दल मला सांगता येणार नाही. माझा भाऊ प्रतिवादी क्र. २ भगवंता याचे नावे गट क्र. १०१/२ मध्ये जमीन आहे. दावा मिळकती ही देऊबाई हिच्या नावे होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा भाऊ भगवंता व आई देऊबाई यांच्यात वाटप झाले म्हणून सदर जमीनी आमच्यानावे झाल्या. वाटप झाल्यापासून वादग्रस्त मिळकतीवर देऊबाइचे नावे असल्याबद्दल मला सांगता येणार नाही. तसेच ताबेदार सदरी तिचे नाव असल्याबद्दल मला सांगता येणार नाही. गट क्र. ३४ ची मालक देऊबाई होती, आम्ही तिची मुले आहोत त्यात आमचाही हिस्सा

आहे. देऊबाई हिने तिच्या हयातीत खेमनर यांच्याविरूध्द फसवणुकिसाठी कुठलीही कार्यवाही केल्याबद्दल मला आठवत नाही. तसेच वादग्रस्त मिळकतीत हिस्सा मिळावा म्हणून मी देऊबाईच्या हयातीत तिच्याविरूध्द कुठलाही वाटपाचा दावा आणला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत हि आमची वडिलोपार्जित असून आमचा हिस्सा असल्याचे मी खोटे सांगत आहे.

८. वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. ३ कडून प्रतिवादी क्र. ५ हिने सन २०१० साली विकत घेतल्याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० पासून वादग्रस्त मिळकत ही चंद्रकला वडितके यांच्या ताब्यात आहे. वादग्रस्त मिळकत देऊबाई हिच्या नावावर झाल्यापासून आजतागायत त्यावर माझा ताबा असल्यासंदर्भात माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावानाही. तसेच वादग्रस्त मिळकत ही आमची एकत्र कुटुंबाची होती हे दर्शवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर प्रतिवादी क्र. ५ हिची मालकी व ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.30 17:07:18 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांकः-३०/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.